# पुणे महानगर परिवहन महामंडळ

## प्रेसनोट

## पीएमपीएमएलच्या कॅशलेस सुविधेला चांगला प्रतिसाद

- पंधरा दिवसात कॅशलेस पेमेंट सुविधेच्या माध्यमातून साडेबारा लाखाचे उत्पन्न.
- ई – तिकीट मशीन मध्ये कॅशलेस पेमेंट द्वारे ४७ हजार तिकिटांची विक्री.

पुणे महानगर परिवहन महामंडळाने दिनांक १ ऑक्टोबर २०२३ पासुन सुरु केलेल्या कॅशलेस (क्युआर कोड द्वारे) पेमेंट सुविधेला चांगला प्रतिसाद मिळत असून पहिल्या पंधरा दिवसात महामंडळाला रक्कम रुपये १२,५५,०२६/- इतके उत्पन्न मिळाले असून ४६,९२२ तिकिटांची विक्री करण्यात आली आहे. तर ५७, ७९५ प्रवाशांनी कॅशलेस (क्युआर कोड द्वारे) तिकीट काढली आहेत.

| दिनांक | यु.पी.आय कॅश र.रु. | यु.पी.आय तिकीट विक्री | प्रवासी संख्या |
|---|---|---|---|
| ०१/१०/२०२३ | ४५,२८१/- | १,६७० | २,२०० |
| ०२/१०/२०२३ | ५६,५४१/- | २,२४७ | २,७८३ |
| ०३/१०/२०२३ | ४८,२००/- | १,९७८ | २,३६४ |
| ०४/१०/२०२३ | ५४,७३०/- | २,१७२ | २,५५४ |
| ०५/१०/२०२३ | ५९,७०१/- | २,४१८ | २,७८९ |
| ०६/१०/२०२३ | ६९,१८३/- | २,६९९ | ३,२२९ |
| ०७/१०/२०२३ | ७५,६९९/- | २,७७४ | ३,३९७ |
| ०८/१०/२०२३ | १,१४,४२१/- | ३,९५५ | ५,३१३ |
| ०९/१०/२०२३ | ८७,००९/- | ३,४७७ | ४,०२४ |
| १०/१०/२०२३ | ७५,४७०/- | २,८३४ | ३,२९० |
| ११/१०/२०२३ | ८६,७९१/- | ३,३०१ | ३,८४१ |
| १२/१०/२०२३ | १,०४,११६/- | ३,८१८ | ४,५४४ |
| १३/१०/२०२३ | १,१५,४३७/- | ४,३०० | ५,१८० |
| १४/१०/२०२३ | १,०५,५०४/- | ३,९०१ | ४,९११ |
| १५/१०/२०२३ | १,५६,९४३/- | ५,३७८ | ७,३७६ |
| **एकूण** | **१२,५५,०२६/-** | **४६,९२२** | **५७,७९५** |

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या बसेसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून तिकीट काढण्यासाठी कॅशलेस (क्युआर कोड द्वारे) पेमेंट सुविधेद्वारे तिकीट काढणेसाठी वापर सध्या वाढत असल्याचे वरील आकडेवारी वरून दिसून येत आहे.

तरी जास्तीत-जास्त प्रवासी नागरिकांनी कॅशलेस (क्युआर कोड द्वारे) पेमेंट सुविधेचा वापर करण्याचे आवाहन पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

---

दि. १६/१०/२०२३.

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.